प्रेस नोट

दिनांक :– २२/०४/२०२४

खाजगी इसमाने केलेल्या लाचेच्या रक्कमेनी मागणी व स्विकार यास लोकसेवक यांनी सहमती दर्शवून प्रोत्साहन दिल्याने खाजगी इसम यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी ताब्यात घेतले बाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | ठाणे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव | १) लोकसेवक राजू धोंडीराम आकरुपे, अन्न सुरक्षा अधिकारी, ठाणे (वर्ग–२) ( पाहिजे आरोपी )<br>२) रोशन मोदी, खाजगी इसम |
| मागितलेली लाचेची रक्कम | ५,०००/– रुपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | ५,०००/– रुपये |
| थोडक्यात हकीकत | तक्रारदार यांनी दि. ०१/०४/२०२४ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे येथे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.२२/०४/२०२४ रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक राजू धोंडीराम आकरुपे, अन्न सुरक्षा अधिकारी, ठाणे यांनी तक्रारदार यांचे मिलथद असलेले दुकान/टपरी उघडुन दिलेबाबत ५०००/– रुपये खाजगी इसम रोशन मोदी यांचेकडे देणेबाबत सांगितले असल्याने खाजगी इसम रोशन मोदी यांनी पडताळणी दरम्यान फोनव्दारे सांगितल्याने निष्पन्न झाले आहे.<br>त्यानुसार वसंत विहार नाका येथे सापळा कारवाई आजमाविली असता, खाजगी इसम रोशन मोदी यांनी तक्रारदार यांचेकडुन अँन्थ्रासिन पावडर लावलेली ५,०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारली असता त्याना १६:३४ वा. रंगेहात पकडुन ताब्यात घेण्यात आले आहे. सदरची रक्कम श्री. आकरुपे यांचेकरीता घेतली असल्याने खाजगी इसम रोशन मोदी यांनी सांगितल्याने त्याबाबत लोकसेवक श्री. आकरुपे यांचेकडे पडताळणी केली असता, लोकसेवक श्री. आकरुपे यांनी ठिक आहे असे सागुन सदर गुन्हयास सहमती दर्शवुन प्रोत्साहन दिले आहे.<br>सदरबाबत गुन्हा दाखल करण्याची पुढील कारवाई चितळसर पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे सुरु आहे. |

मार्गदर्शनअधिकारी– मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
मा. श्री. महेश तरडे, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
मा. श्री. गजानन राठोड, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा सबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांचेशी संपर्क करावा

---

संपर्क पत्ता :– लाप्रवि ठाणे मध्यवर्ती कारागृह समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ :–acbmaharastra@mahapolice.gov.in
ईमेल–spacbthane@mahapolice. Gov.in
अँप्लीकेशन –acbmaharastra.net,
टोल फ्रि नंबर –१०६४, दुरध्वनी कमांक –०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसअँप्प कमांक –९९३०९९७७००
दिनांक :– २२/०४/२०२४

ASPatil

( अश्विनी पाटील )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे.